MHAH040004332024	दाखल दिनांक	:	२०/०६/२०२४
	नोंदणी दिनांक	:	२०/०६/२०२४
	निकाल दिनांक	:	०३/०८/२०२६
	कालावधी	:	वर्ष महिने दिवस ०२ – ०१ – १४

सदस्य, मोटार अपघात न्यायाधिकरण, श्रीरामपूर यांच्यासमोर
(पिठासीन अधिकारी : श्री.श्रीपाद एस.देशपांडे)

मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र.११३/२०२४ **निशाणी क्र.३१**

उझेर मोहम्मदरफीक खान,
वय – १७ वर्षे, धंदा – शिक्षण,
अर्जदारातर्फे अ.पा.क.म्हणून वडील –
मोहम्मदरफीक अब्दुलकरीम खान,
वय – ५३ वर्षे, धंदा – मजुरी,
रा.हाऊस नं.१४०, म्हाडा कॉलनी, नदी
नाका, भिवंडी, ठाणे.
ह.मु.वार्ड नं.२,ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर. **अर्जदार**

विरूध्द

१. **विनायक कान्हु गायकर,**
वय – सज्ञान वर्षे, धंदा – व्यापार,
रा.किशोर, ता.मुरबाड, कल्याण
ठाणे – ४२१४०१

२. **ब्रँच मॅनेजर साहेब,**
टाटा ए.आय.जी.जनरल इन्शुरन्स कं.लि.,
२०२, ए दुसरा मजला, ओरियन,
कोरेगाव पार्क, पुणे. **सामनेवाले**

पक्षकारांचे विधिज्ञ :
अर्जदारातर्फे विधिज्ञ – श्री. वाय.के.शेख.
सामनेवाला क्र.१ – एकतर्फा.

सामनेवाला क्र.२ – श्री. एस.बी.तांबे.

न्यायनिर्णय

(दिनांक ०३ ऑगस्ट, २०२६ रोजी घोषित)

अर्जदार याने हा अर्ज मोटार वाहन कायदा कलम १६६ अन्वये अपघात नुकसान भरपाई रक्कम रूपये पंधरा लाख मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार याने कथन केले आहे की, दि.०३/०५/२०२४ रोजी सकाळी अर्जदार इंडिला कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, बापसई, ता.कल्याण येथे एम.एच.टी.सी.ई.टी.चा पेपर असल्याने तो त्याचा मोठा भाऊ रशीद मोहम्मदरफीक खान याच्याबरोबर मोटारसायकल क्र.एम.एच.०४ जी.बी.६५४७ हीच्यावर पाठीमागे बसून निघाला होता. त्यावेळी मोटारसायकल ही अर्जदार याचा मोठा भाऊ रशिद हा डोक्यात हेल्मेट घालून रस्त्याच्या परिस्थितीचा विचार करून सावकाशपणे चालवत होता. सदर मोटारसायकल वरप गावाच्या शिवारात कल्याण ते मुरबाड जाणा–या हायवे रोडवर कोणार्क मिंडोज प्रवेशद्वारसमोर सकाळी ६.३० च्या सुमारास आली असता त्याचवेळी भरधाव वेगात येणारी स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ हिने अर्जदार पाठीमागे बसून जात असलेल्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. सदरची धडक इतकी जबरदस्त होती की, अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीस गंभीर स्वरूपाचा मार लागून फ्रॅक्चर झाले होते. तसेच सदर मोटारसायकल चालवत असलेला अर्जदाराचा मोठा भाऊ मयत रशीद याच्या डोक्याला मोठया प्रमाणावर गंभीर स्वरूपाचा मार लागून त्याचा औषधोपचारापूर्वीच अपघाती मृत्यू झाला. सदर अपघातात स्कुटर चालकाने स्कुटर भरधाव वेगात, हयगयीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून चालवून अपघात केल्यामुळे स्कुटर चालकाचीच

संपूर्णपणे चूक असल्याकारणाने त्याच्याविरूध्द कल्याण तालुका पोलिस स्टेशनला अपघाताचा गुन्हा दाखल झाला.

३. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, सदर अपघातात अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीला मोठया प्रमाणावर गंभीर स्वरूपाचा मार लागलेला आहे. सदर अपघातानंतर त्यास उल्हासनगर म्युनीसीपल हॉस्पीटल येथे नेण्यात आले, तेथे प्रथमोपचार होवून पूढील औषधोपचाराकामी लाईफलाईन हॉस्पीटल, कल्याण येथे ॲडमिट करण्यात आले. तेथे त्याच्यावर दि.०३/०५/२०२४ ते १८/०५/२०२४ पर्यंत ऑपरेशन व औषधोपचार करण्यात आले व आजही औषधोपचार चालूच असून सदर औषधोपचाराकामी ७ लाख खर्च झालेला असून पुढेही खर्च येणार आहे. सदरचा खर्च होवून देखील त्यास कायमस्वरूपी अपंगत्व आलेले आहे, वगैरे कथन करून त्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. सामनेवाले नं.१ याला नोटीस लागूनही तो गैरहजर राहिला. सबब, त्याच्याविरूध्द एकतर्फा हुकूम करण्यात आला. सामनेवाला नं. २ यांनी निशाणी क्र.१९ वर कैफियत देवून अर्जातील सर्व कथने नाकारली आहे व कथन केले आहे की, सदरचा अपघात हा स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ मुळे झालेला नाही. सदर अपघातात अर्जदाराला कोणतेही अपंगत्व आलेले नाही. सदरची स्कुटर अतिशय भरधाव वेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून जास्त वेगाने जात होती हे त्यांना मान्य नाही. स्कुटर चालकाला वाहन चालवण्याचा वैध परवाना नव्हता. त्यामुळे विमा कंपनीच्या अटी व शर्तीचा भंग झाला आहे त्यामुळे विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास बांधील नाही. त्यांनी स्कुटर चालक अतिशय हळू, रस्त्याच्या परिस्थितीकडे व्यवस्थित लक्ष देवून चालवत होता, त्या अपघातात त्याची चुक नव्हती असे कथन केले आहे. सदरच्या अपघातामुळे अर्जदार याला

कायमस्वरूपीचे अपंगत्व आल्याचे त्यांना मान्य नाही. पुढे त्यांनी कथन केले की, पोलिसांनी ३० दिवसात अपघाताबाबत नुकसान भरपाईचा प्रस्ताव पाठवणे गरजेचे होते, तो पाठवला नाही. पुढे त्यांनी अर्जदाराचे वय १७ वर्षे होते व तो १२वीत शिकत होता हे नाकारले आहे. अर्जदाराची नुकसान भरपाई मागणी अवास्तव व अतिशयोक्ती आहे, त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. मी निशाणी क्र.२० वर खालीलप्रमाणे मुद्दे काढले. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.वाय.के.शेख व सामनेवाला क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.तांबे यांचा युक्तिवाद ऐकला असता त्या मुद्दयांचे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	अर्जदार सिध्द करतो का की, दि.०३/०५/२०२४ रोजीचा अपघात स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ च्या चालकाच्या चुकीमुळे झाला ?	**होय.**
२.	अर्जदार सिध्द करतो का की, सदर अपघातात अर्जदार गंभीर जखमी झाला व त्याला कायमस्वरूपी अपंगत्व आले ?	**होय.**
३.	सामनेवाले नं.२ विमा कंपनी सिध्द करते का की, विमा कंपनीच्या अटी व शर्तींचा भंग झाला ?	**नाही.**
४.	सामनेवाले नुकसान भरपाई देण्यास बांधील आहेत का? असल्यास किती ?	**होय. सामनेवाले नं.१ व २ कडून रू.१३,९७,८००/-**
५.	काय आदेश व निवाडा ?	**अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.**

: कारणमिमांसा :

६. अर्जदार याने स्वत:ला निशाणी क्र.२२ वर साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले आहे. अर्जदार याने निशाणी क्र.३ सोबत प्रथम खबर, फिर्याद, घटनास्थळ

पंचनामा, इन्ज्युरी प्रमाणपत्र, आरसी बुक, विमा पॉलिसी, वाहन चालवण्याचा परवाना इ. यांच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. तसेच निशाणी क्र.२५ वर अर्जदाराचे आधारकार्डची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. तसेच निशाणी क्र.२४ सोबत डिस्चार्ज कार्ड, केस पेपर, मेडिकल बिल दाखल केलेले आहेत. अर्जदाराने नि.क्र.२९ सोबत सीईटी पेपरच्या हॉलतिकीटची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच निशाणी क्र.२४ सोबत सिव्हील हॉस्पीटल अहमदनगरचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. सामनेवाले यांनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

मुद्दे क्र.१ व २ बाबत :

७. अर्जदाराने सरतपासात कथन केले आहे की, दि.०३/०५/२०२४ रोजी सकाळी अर्जदार इंडिला कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, बापसई, ता.कल्याण येथे एम.एच.टी.सी.ई.टी.चा पेपर असल्याने तो त्याचा मोठा भाऊ रशीद मोहम्मदरफीक खान याच्याबरोबर मोटारसायकल क्र.एम.एच.०४ जी.बी.६५४७ हीच्यावर पाठीमागे बसून निघाला होता. त्यावेळी मोटारसायकल ही अर्जदार याचा मोठा भाऊ रशिद हा डोक्यात हेल्मेट घालून रस्त्याच्या परिस्थितीचा विचार करून सावकाशपणे चालवत होता. सदर मोटारसायकल वरप गावाच्या शिवारात कल्याण ते मुरबाड जाणा-या हायवे रोडवर कोणार्क मिंडोज प्रवेशद्वारसमोर सकाळी ६.३० च्या सुमारास आली असता त्याचवेळी भरधाव वेगात येणारी स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ हिने अर्जदार पाठीमागे बसून जात असलेल्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. सदरची धडक इतकी जबरदस्त होती की, अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीस गंभीर स्वरूपाचा मार लागून फ्रॅक्चर झाले होते. तसेच सदर मोटारसायकल चालवत असलेला अर्जदाराचा मोठा भाऊ मयत रशीद याच्या डोक्याला मोठया प्रमाणावर गंभीर स्वरूपाचा मार लागून त्याचा औषधोपचारापूर्वीच अपघाती मृत्यू झाला. सदर अपघातात स्कुटर चालकाने स्कुटर भरधाव वेगात, हयगयीने व रस्त्याच्या

परिस्थितीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून चालवून अपघात केल्यामुळे स्कुटर चालकाचीच संपूर्णपणे चूक असल्याकारणाने त्याच्याविरूध्द कल्याण तालुका पोलिस स्टेशनला अपघाताचा गुन्हा दाखल झाला. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, सदर अपघातात अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीला मोठया प्रमाणावर गंभीर स्वरूपाचा मार लागलेला आहे. सदर अपघातानंतर त्यास उल्हासनगर म्युनीसीपल हॉस्पीटल येथे नेण्यात आले, तेथे प्रथमोपचार होवून पूढील औषधोपचाराकामी लाईफलाईन हॉस्पीटल, कल्याण येथे ॲडमिट करण्यात आले. तेथे दि.०३/०५/२०२४ ते १८/०५/२०२४ पर्यंत ऑपरेशन व औषधोपचार करण्यात आले व आजही औषधोपचार चालूच असून सदर औषधोपचाराकामी ७ लाख खर्च झालेला असून पुढेही खर्च येणार आहे. सदरचा खर्च होवून देखील त्यास कायमस्वरूपी अपंगत्व आलेले आहे. सदर ४१ टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र सिव्हील हॉस्पीटल अहमदनगर यांनी दिले आहे. अपघाताच्या वेळेस त्याचे वय सुमारे १७ वर्षाचे होते व तो बारावी सायन्सचे शिक्षण घेत होता. सदर अपघाताच्या त्याच्या डोक्यास व सरीस मोठया प्रमाणवर गंभीर स्वरूपाचा मार लागल्याने त्याला कायमस्वरूपी अपंगत्व आले असून सदर अपंगत्वामुळे त्याच्या शैक्षणिक जीवनावर मोठया प्रमाणावर परिणाम झालेला आहे. सदर अपघात झाला नसता तर तो त्याचे पुढील इंजिनिअरींगचे शिक्षण पूर्ण करून चांगली नोकरी करून चांगल्या प्रकारे उत्पन्न कमवू शकत होता.

८. उलटतपासात त्याने कथन केले आहे की, त्याची जन्म तारीख दि.१८/०४/२००७ अशी आहे. त्याने कथन केले की, अपघाताच्या वेळेस त्याची बारावी झाली होती. त्याने कथन केले की, त्याला बारावीला ४२ टक्के मार्क पडले होते. ४५ टक्के मार्क पडले तरच इंजिनिअरींगला ॲडमिशन मिळते हे त्याला माहिती आहे. त्याने नाकारले की, अपघात झाला नसता तर तो इंजिनीयर झाला असता

असे त्याने खोटे लिहिले आहे. त्याने कथन केले की, त्याच्यावर चांगले उपचार झाले होते, त्याच्या जखमा भरून आल्या. सदर साक्षीदाराच्या डोक्यावर उजव्या कानाच्यावर ऑपरेशन झाल्याचे व्रण दिसून येतात. त्याने कथन केले की, अपघात दोन गाडयामध्ये समोरासमोर धडक होवून झाला आहे. त्याने नाकारले की सामनेवालेच्या गाडीची अपघातामध्ये कोणतीही चूक नव्हती.

९. अर्जदाराच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, दि.०३/०५/२०२४ रोजी अर्जदार त्याचा मोठा भाऊ रशीद मोहम्मदरफीक खान याच्याबरोबर मोटारसायकल क्र.एम.एच.०४ जी.बी.६५४७ हीच्यावर पाठीमागे बसून निघाला होता. सदर मोटारसायकल वरप गावाच्या शिवारात कल्याण ते मुरबाड जाणा–या हायवे रोडवर कोणार्क मिंडोज प्रवेशद्वारसमोर भरधाव वेगात येणारी स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ हिने अर्जदार पाठीमागे बसून जात असलेल्या मोटारसायकलला समोरून जोराची धडक दिली. सदरच्या अपघातात अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीस गंभीर स्वरूपाचा मार लागून फ्रॅक्चर झाले होते. त्याच्यावर दि.०३/०५/२०२४ ते १८/०५/२०२४ पर्यंत ऑपरेशन व औषधोपचार करण्यात आले व आजही औषधोपचार चालूच असून सदर औषधोपचाराकामी ७ लाख खर्च झालेला असून पुढेही खर्च येणार आहे. सदरचा खर्च होवून देखील त्यास कायमस्वरूपी अपंगत्व आलेले आहे त्यामुळे अर्जदाराच्या मागणीनुसार नुकसान भरपाई मंजूर करावी.

१०. याउलट सामनेवालाच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, स्कुटरने धडक दिली हे सिध्द होत नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

११. आलेला पुरावा पाहता असे दिसून येते की, पोलिसांनी स्कुटर चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर चालकाने किंवा मालकाने खोटा गुन्हा

दाखल केला म्हणून कोठेही दाद मागितली नाही. जर खरोखर स्कुटरचा सहभाग नसता तर चालकाने किंवा मालकाने दाद मागितली असती परंतु तसे घडले नाही. अर्जदाराच्या साक्षीवरून दि.०३/०५/२०२४ रोजी अर्जदार त्याचा मोठा भाऊ रशीद मोहम्मदरफीक खान याच्याबरोबर मोटारसायकल क्र.एम.एच.०४ जी.बी.६५४७ हीच्यावर पाठीमागे बसून जात असतांना सदर मोटारसायकलीस भरधाव वेगात येणारी स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ हिने अर्जदार पाठीमागे बसून जात असलेल्या मोटारसायकलला समोरून जोराची धडक दिली. सदरच्या अपघातात अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीस गंभीर स्वरूपाचा मार लागून फ्रॅक्चर झाले होते असे कथन केले आहे. त्याच्या उलटतपासात त्याच्यावर गैरविश्वास दाखवण्यासारखे काहीही आलेले नाही. त्याच्या जबाबावरून दि. ०३/०५/२०२४ रोजीचा अपघात स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ च्या चालकाच्या चुकीमुळे झाला असे दिसून येते. अर्जदार हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. तसेच त्याच्या जबाबास स्कुटर चालकाविरूध्द दाखल असलेले दोषारोपपत्र पुष्टी देते. यावरून स्कुटर चालकाने निष्काळजीपणाने स्कुटर चालवून पाठीमागे बसलेल्या अर्जदाराच्या मोटारसायकलीस समोरून जोराची धडक दिली, सदरच्या अपघातात अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीस गंभीर स्वरूपाचा मार लागून फ्रॅक्चर झाले व त्यास कायमस्वरूपी अपंगत्व आले हे सिध्द होते. सबब, मी मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी देतो.

<u>मुद्दा क्र. ३ बाबत :</u>

१२. सामनेवाले क्र.२ यांनी स्कुटर क्र.एम.एच.०५ इ.टी.८९१९ चालकास वैध परवाना नव्हता त्यामुळे विमा पॉलिसीचा भंग झाला असे कथन केले आहे परंतु अपघाताच्या वेळी व दिवशी सदर गाडी ही सामनेवाला नं.२ कंपनीकडे इन्शुअर्ड होती. अपघाताच्या दिवशी सदर पॉलीसी वैध होती तसेच सदर वाहनचालकास

व्हॅलीड ड्रायव्हींग लायसन्स होते. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याने विमा पॉलिसीच्या अटी व शर्तींचा भंग केला, हे सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी देतो.

मुद्दा क्र. ४ बाबत :

१३. अर्जदाराच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हा बारावी पास झालेला विद्यार्थी आहे आणि तो इंजिनियरींगला ॲडमिशन घेणार होता. तो भविष्यात इंजिनियर झाला असता आणि चांगली नोकरी मिळवून पैसे कमवू शकला असता, पण अपघातामुळे तो शिक्षण पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे त्याचे उत्पन्न रू.१२,०००/- गृहित धरून ४१ टक्के कायमस्वरूपी अपंगत्व गृहित धरून नुकसान भरपाई दयावी.

१४. सामनेवालाच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, इंजिनियर व्हायला कमीत कमी ४५ टक्के लागतात, या अर्जदाराला ४२ टक्के मार्क १२वीत पडलेले आहेत. त्यामुळे तो इंजिनियर होवू शकत नाही त्यामुळे त्याचे उत्पन्न रू.९०००/- आणि कायमस्वरूपी अपंगत्व ३० टक्के गृहित धरून नुकसान भरपाई दयावी.

१५. आलेला पुरावा पाहता असे दिसते की, दि.०३/०५/२०२४ रोजीच्या अपघातात अर्जदाराच्या डोक्यास व उजव्या सरीस गंभीर स्वरूपाचा मार लागून फ्रॅक्चर झाले होते. त्याच्यावर दि.०३/०५/२०२४ ते १८/०५/२०२४ पर्यंत ऑपरेशन व औषधोपचार करण्यात आले, त्याला कायमस्वरूपी अपंगत्व आले असून सदर अपंगत्वामुळे त्याच्या शैक्षणिक जीवनावर मोठया प्रमाणावर परिणाम झालेला आहे. परंतु त्यास ४२ टक्के मार्कस् बारावीत पडले आहेत म्हणजे तो इंजिनियरींगला ॲडमिशन घेण्यास पात्र नाही. त्यामुळे तो एक साधारण विद्यार्थी

होता, त्यामुळे त्याचे त्यामुळे त्याचे दरमहा उत्पन्न रू.१०,०००/– गृहित धरले तर योग्य होईल असे वाटते. वैद्यकीय अधिका–याने ४१ टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिले असले तरी सुध्दा वैद्यकीय अधिकारी तंतोतंत अपंगत्व काढू शकत नाही, त्यात काही कमी–जास्त होते त्यामुळे ३५ टक्के अपंगत्व गृहित धरून नुकसान भरपाई काढली तर न्यायोचित होईल असे वाटते. त्याचे उत्पन्न १०,०००/– गृहित धरले तर योग्य होईल असे वाटते रू.१०,०००/– च्या ३५ टक्के ३५००/– होतात, मासिक उत्पन्न रू ३,५००/–, वार्षीक उत्पन्न रू.४२,०००/– होते. आधारकार्डवर त्याची जन्मतारीख १८/०४/२००७ आहे. अपघात दि.०३/०५/२०२४ रोजी झालेला आहे त्यावेळी त्याचे वय १७ वर्षे असल्याने १८ चा गुणक लावला तर रू ७,५६,०००/– उत्पन्न होते. भविष्यातील उत्पन्न ४० टक्के मंजूर केल्यास रू.३,०२,४००/– होतात. तसेच त्याचे मेडिकल बिल रू.२,९९,४००/– दाखल आहे त्या रकमेस तो पात्र आहे. विशेष आहार व यातना व त्रास यासाठी प्रत्येकी २०,०००/– मंजूर केले तर न्यायोचित होईल असे वाटते. त्यामुळे ती वरीलप्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरते. अर्जदार खालीलप्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

अ.क्र.	तपशिल	रक्कम (रूपये)
१.	नुकसान भरपाईची रक्कम	७,५६,०००/–
२.	४० टक्के भविष्यातील उत्पन्न	३,०२,४००/–
३.	वैद्यकीय खर्च	२,९९,४००/–
४.	यातना व त्रास	२०,०००/–
५.	विशेष आहार	२०,०००/–
	एकुण	**१३,९७,८००/–**

याप्रमाणे अर्जदार एकुण नुकसान भरपाई **रू.१३,९७,८००/–**(अक्षरी तेरा लाख सत्याण्णव हजार आठशे रूपये), विनादोष दायित्व अनुषंगाने मिळालेली नुकसान भरपाई रक्कमेसह मिळणेस पात्र आहेत. तसेच अर्जदार अर्ज दाखल केलेल्या

तारखेपासून द.सा.द.शे. ६% दराप्रमाणे व्याज मिळण्यास पात्र आहेत असे निर्णित केले तर न्यायोचित होईल म्हणून मी मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष वरीलप्रमाणे देतो.

<u>मुद्दा क्र. ५ बाबत :</u>

१६. वरील सर्व बाबींचा विचार करता वरील प्रमाणे अर्ज मंजूर केला तर न्यायोचित होईल असे वाटते. मा.सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय **परमिंदर सिंग वि. हनी गोयल व इतर**, (सिव्हील अपील नं. .../२०२५ अराझिंग आऊट ऑफ एस.एल.पी.(सि.)नं. ४४८४/२०२०) या न्यायनिर्णयानुसार अर्जदार सदर रक्कम त्याच्या बँक खात्यात वर्ग होण्यास पात्र आहे. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे –

:: <u>आदेश</u> ::

१. अर्जदाराचा कलम १६६ मोटार वाहन कायदा प्रमाणे अंशत: अर्ज मंजूर करण्यात येतो. खर्च अर्ज मंजूरीच्या प्रमाणात मंजूर करण्यात येतो (Proportionate Costs).
२. सामनेवाले क्र.१ व २ यांनी अर्जदार याला वैयक्तिक व संयुक्तिकरित्या, नुकसान भरपाई पोटी रक्कम **रू.१३,९७,८००/–**(अक्षरी तेरा लाख सत्याण्णव हजार आठशे रूपये),(मोटार वाहन कायदयाचे कलम १४० प्रमाणे मिळणारी अंतरीम नुकसान भरपाईच्या रक्कमेसह) अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून ते संपूर्ण रक्कम हातात मिळेपर्यंत द.सा.द.शे. ६% व्याजासह अर्जदारास दयावे असा हुकूम देण्यात येतो.
३. सामनेवाला नं.२ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी वरील नुकसान भरपाई व व्याज सदर अर्जदाराच्या खात्यात वर्ग करावी.
४. सामनेवाला नं.२ यांनी रक्कम वर्ग करण्यापूर्वी अर्जदाराच्या एकटयाच्या नावे खाते आहे का याची खात्री करावी, त्याच्या संयुक्त खात्यावर रक्कम वर्ग करू नये.
५. सामनेवाला नं.२ यांनी वरीलप्रमाणे पुर्तता केल्यानंतर या

न्यायालयास आठ आठवडयात कळवावे.

६. कमी असलेले न्यायालयीन शुल्क भरल्यावर वरीलप्रमाणे निवाडा (Award) तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुला न्यायालयात उदघोषित करण्यात आला.)

SHRIPAD SHARAD DESHPANDE

Digitally signed by SHRIPAD SHARAD DESHPANDE Date: 2026.08.04 10:55:22 +0530

दिनांक :०३/०८/२०२६

(श्रीपाद एस. देशपांडे)
सदस्य, मोटार अपघात न्यायाधिकरण,
श्रीरामपूर